N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** हिंगोली    **P.S.(ठाणे):** हिंगोली शहर    **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0152    **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/06/2021 19:18 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार    **Date From (दिनांक पासून):** 25/05/2021

**Time Period (कालावधी):** पहर 6    **Date To ( दिनांक पर्यंत):** 25/05/2021

**Time From (वेळेपासून):** 16:40 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:06 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/06/2021    **Time (वेळ):** 18:38 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 031    **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/06/2021 18:38 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 01 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय हिंगोली , तहसिल कार्यालय हिंगोली ,हिंगोली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** निलेश देविदास सुरडकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1983    (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**    **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,हिंगोली ,हिंगोली ,हिंगोली शहर,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,हिंगोली ,हिंगोली ,हिंगोली शहर,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** नोकरी

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | माचेवाड | | | 1. तहसील कार्यालय हिंगोली ,हिंगोली , हिंगोली ,हिंगोली शहर,हिंगोली,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक:- 01.06.2021. मी, निलेश देविदास सुरडकर, वय 38 वर्ष, व्यवसाय नौकरी, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हिंगोली. जि. हिंगोली. सरकार तर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, मी अन्टी करप्शन ब्युरो हिंगोली युनिट येथे दि.18.03.2021 पासुन पोलीस उप अधीक्षक या पदावर कार्यरत आहे. दिनांक 25.05.2021 रोजी तक्रारदार अजय उर्फ अजिंक्य सुदामराव नागरे, वय 23 वर्षे व्यवसाय शेती रा.वंजारवाडा हिंगोली यांनी तक्रार दिली होती की, मी फेब्रुवारी 2021 पासुन रेती वाहतुकीसाठी पाच टिप्पर भाडयाने घेतले होते. सदर भाडयाने घेतलेले टिप्पर मागील विस ते पंचवीस दिवसापुर्वी रेतीची वाहतुक करीत असतांना हिंगोली पोलीसांनी पकडुन पोलीस स्टेशन हिंगोली शहर येथे लावुन मा.तहसिलदार, हिंगोली यांना पत्रक देवुन पुढील कार्यवाही करणे बाबत कळविले त्यावरून श्री माचेवाड, तहसिलदार हिंगोली यांना जावुन भेटलो असता रेतीच्या पकडलेल्या पाच टिप्पर ची लवकर कार्यवाही करून लवकर सोडण्यासाठी व रेतीचे टिप्परवर कार्यवाही न करण्यासाठी मागील महिन्याचे पैसे असे मिळुन 3,00,000/- रू लाचेची मागणी करीत आहेत. अशी तक्रार दिली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने सापळयाची कार्यवाही करण्यासाठी मा.आरोग्य अधिकारी, जिल्हा परिशद हिंगोली यांना लेखी पत्र देवून पंच उपलब्ध करून देण्याची विनंती केली असता त्यांनी 1) श्री रामकृष्ण श्रीधरराव बोरकर, वय 46 वर्ष,कनिश्ठ सहायक 2) श्री राजीव प्रकाशराव घुगे, वय 31 वर्ष, कनिश्ठ सहायक, यांची पंच म्हणुन सेवा उपलब्ध करून दिली. त्यावरून दिनांक 25.05.2021 रोजी 14.00 वा. दोन्ही पंच अन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली येथे हजर आले. त्यानंतर दोन्ही पंचांना तक्रारदार श्री अजय उर्फ अजिंक्य सुदामराव नागरे यांची ओळख करून देण्यात आली व तक्रारदार यांना दोन्ही पंचांची ओळख करून देण्यात आली. त्यानंतर तक्रारदार श्री नागरे यांनी अ.क.ब्यु. कार्यालय, हिंगोली येथे दिनांक 25.05.2021 रोजी दिलेली तक्रार पंचांना वाचावयास दिली. त्यानंतर तक्रारदार श्री अजय उर्फ अजिंक्य सुदामराव नागरे यांनी त्यांची तक्रार तोंडी कथन केली. सदर कारवाईमध्ये वापरण्यात येणा-या व्हईस रेकर्डर बाबत तक्रारदार व दोन्ही पंचाना सविस्तर माहिती देण्यात आली. त्याबाबत सविस्तर पडताळणीपुर्व पंचनामा केला. त्यानुसार तक्रारदार श्री नागरे यांचे तक्रारीची पडताळणी करण्याकरीता तक्रारदार श्री नागरे व पंच क्र.1 श्री बोरकर यांना लोकसेवक माचेवाड, तहसिलदार यांची भेट घेण्याकरीता त्यांचे तहसिल कार्यालय हिंगोली येथे भेट घेऊन पडताळणी करण्याचे ठरविले होते. त्यानंतर दिनांक 25.05.2021 रोजी तहसिल कार्यालय हिंगोली येथे तक्रारदार श्री अजय उर्फ अजिंक्य नागरे व पंच क्रमांक 01 श्री बोरकर यांना पाठवून तक्रारदार श्री नागरे यांच्या तक्रारीची पडताळणी करण्यात आली. तक्रार पडताळणी दरम्यान तक्रारदार श्री नागरे व लोकसेवक माचेवाड, तहसिलदार हिंगोली यांची तहसिल कार्यालय हिंगोली येथे प्रत्यक्ष भेट झाली. तक्रारदार श्री नागरे, व लोकसेवक माचेवाड, तहसिलदार यांच्या भेटी दरम्यान झालेल्या संभाषणा वरून तक्रारदार श्री नागरे यांचे हिंगोली पोलीसांनी रेती वाहतुक करीत असलेले पाच टिप्पर पकडुन पोलीस स्टेशन हिंगोली शहर येथे लावलेले त्या पाच टिप्परवर लवकर कार्यवाही करून लवकर सोडण्यासाठी व रेतीची वाहतुक करणारे टिप्परवर कार्यवाही न करण्यासाठी मागील महिन्याचे राहिलेले

पैसे असे मिळुन 3,00,000/- रू लाच स्विकारण्यास सहमती दिली. तेव्हा आम्ही सर्वानुमते लोकसेवक माचेवाड, तहसिलदार हिंगोली यांचे विरूध्द लाचेचा सापळा आयोजीत करण्याचे ठरविले. तेव्हा तक्रारदार श्री नागरे यांनी सांगितले की, लोकसेवक माचेवाड, तहसिलदार यांनी लाचेची रक्कम स्वतः उदईक दि.26.05.2021 रोजी तहसिल कार्यालय हिंगोली येथे घेवुन येण्याचे सांगितले असुन दिनांक 26.05.2021 रोजी लोकसेवक माचेवाड यांचा ठावठिकाणा घेवुन आल्यावर पुढील कार्यवाही करावी असे सांगीतले. त्यावरून आम्ही तक्रारदार श्री नागरे हे लोकसेवकाचा ठावठिकाणा घेवुन आल्या नंतर दिनांक 26.05.2021 रोजी लोकसेवक माचेवाड, तहसिलदार हिंगोली यांचे विरूध्द लाचेचा सापळा आयोजित करण्याचे सर्वानुमते ठरविले. सदर तक्रार पडताळणी दरम्यान तक्रारदार श्री नागरे, व लोकसेवक माचेवाड, तहसिलदार यांच्या मध्ये झालेले संभाषण तक्रारदार यांच्या जवळ देण्यात आलेल्या व्हईस रेकर्डर मधील मेमरी कार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत झाले आहे. सदर बाबतचा सविस्तर तक्रार पडताळणी पंचनामा करण्यात आला. त्यानंतर दिनांक. 26.05.2021 रोजी तक्रारदार श्री नागरे हे समक्ष ए. सिबी कार्यालयात हजर आले व त्यांनी सांगीतले की, लोकसेवक माचेवाड, तहसिलदार यांचे ठावठिकाणा बाबत माहिती घेतली असता आज बौध्द पोर्णिमेची शासकिय सुट्टी असल्याने लोकसेवक माचेवाड, तहसिलदार हे तहसिल कार्यालय हिंगोली येथे आले नसल्याचे मला समजले आहे. तरी श्री माचेवाड तहसिलदार यांचा दि.27.05.2021 रोजी ठावठिकाणा घेवुन आल्यानंतर त्यांचे विरूध्द पुढील कार्यवाही करावी असे सांगितले. त्यावरून आम्ही तक्रारदार श्री नागरे हे लोकसेवकाचा ठावठिकाणा घेवुन आल्या नंतर दिनांक 27.05.2021 रोजी लोकसेवक माचेवाड, तहसिलदार हिंगोली यांचे विरूध्द लाचेचा सापळा आयोजित करण्याचे सर्वानुमते ठरविले. त्यावरून दि.27.05.2021 रोजी आम्ही तक्रारदार श्री नागरे यांना संपर्क करण्याचा प्रयत्न केला परंतु तक्रारदार नागरे यांचा संपर्क झाला नाही. तसेच तक्रारदार नागरे यांची आम्ही लाप्रवि कार्यालयात वाट पाहिली परंतु ते लाप्रवि कार्यालयात हजर आले नाही. त्यामुळे आम्ही सविस्तर स्थगिती पंचनामा केला. दि. 28.05.2021 रोजी तक्रारदार श्री अजय उर्फ अजिंक्य नागरे हे समक्ष अंन्टी करप्शन ब्युरो हिंगोली कार्यालयात हजर येवुन सदर प्रकरणात माझे खाजगी अडचणीमुळे कार्यवाही करण्याची इच्छा नसल्याने पुढील कार्यवाही करू नये व लाच देण्यासाठी कार्यालयात जमा केलेले 3,00,000/- रूपये मला परत मिळावे असा लेखी अर्ज सादर केला. त्यांवरून पुढील सापळा कारवाई तात्पुरती स्थगीत करून तक्रारदार श्री नागरे यांचे 300,000/- रू त्यांना दि.31.05.2021 रोजी पोहच पावती घेवुन परत देण्यात आले. एकंदरीत झालेल्या सापळा कारवाई वरून दि.25.05.2021 रोजी लोकसेवक माचेवाड, तहसिलदार तहसिल कार्यालय हिंगोली यांनी तक्रारदार श्री अजय उर्फ अजिंक्य नागरे यांच्याकडे त्यांचे पोलीसांनी रेतीची वाहतुक करीत असतांना पकडलेले पाच टिप्परची लवकर कार्यवाही करून लवकर सोडण्यासाठी व रेतीचे टिप्परवर कार्यवाही न करण्यासाठी मागील महिन्याचे पैसे असे मिळुन 3,00,000/- रू लाचेची रक्कम स्विकारण्यास सहमती दिली. लोकसेवक माचेवाड, तहसिलदार यांनी तक्रारदार श्री नागरे यांना लाचेची मागणी करून गैरवर्तन करून लोकसेवक या नात्याने कायदेशीर काम करण्यासाठी मिळणारे परिश्रमिका खेरिज पारितोषण अथवा लाच म्हणुन स्वतःसाठी आर्थिक फायदा मिळविण्याचा प्रयत्न केला. म्हणुन लोकसेवक माचेवाड, तहसिलदार, तहसिल कार्यालय हिंगोली यांचे विरूध्द कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988. प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

फिर्याद दिली सही (निलेश सुरडकर)
पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हिंगोली.

**13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** PANDIT SOPANRAO KACHAVE(I (Inspector)) / POBN51424 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14. **Signature/Thumb Impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name (नाव):** PANDIT SOPANRAO KACHAVE
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN51424

पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे.हिंगोली (शहर)